# कार्यालय, नागपूर महानगरपालिका नागपूर

## (सचिवालय)

## सुचना

परिवहन समितीची सभा, शनिवार दि. ०१/०२/२०२० रोजी सकाळी ११:०० वाजता सिव्हील लाईन्स कार्यालयातील **डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती, सभागृहात** खालील विषयावर चर्चा करण्याकरिता भरणार आहे.

आदेशान्वये,

नागपूर
दिनांक — २४/०१/२०२०

**(राजेश एम. मोहिते)**
उपायुक्त तथा
निगम सचिव
महानगरपालिका, नागपूर

**विषय क्रमांक ०७ :—** परिवहन विभाग, मनपा चे आर्थिक वर्ष २०१९—२० मध्ये मनपा निधीतून रु. १०८ कोटी निधी मंजूर करण्यात आला असून NMC The City of Nagpur Transport Fund, या बॅक ऑफ महाराष्ट्र, सिव्हिल लाईन्स नागपूरच्या Current Account मध्ये सुरूवातीची शिल्लकसह माहे ऑक्टोंबर २०१९ रू. ६,४६,९१,३४०/— तिकीट विक्री चा महसुल जमा झाला आहे. त्यापैकी ऑक्टोंबर २०१९ एकूण रु. **१८,३३,२३,१७२**/— हा विविध लेखाशिर्षा अंतर्गत खर्च झाला आहे.

या खर्चाचा लेखाजोखा परिवहन समीती समक्ष सादर करून व मान्यता प्राप्त करून कार्योत्तर वित्तीय मान्यता घेण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :— सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.

**विषय क्रमांक ०८ :—** परिवहन विभाग, मनपाचे आर्थिक वर्ष २०१९—२० मध्ये मनपा निधीतून रु. १०८ कोटी निधी मंजूर करण्यात आला असून NMC The City of Nagpur Transport Fund, या बॅक ऑफ महाराष्ट्र, सिव्हिल लाईन्स नागपूर च्या Current Account मध्ये सुरूवातीची शिल्लकसह माहे नोव्हेंबर २०१९ रू. ६,९३,१५,५१५.५०/—तिकीट विक्री चा महसुल जमा झाला आहे. त्यापैकी नोव्हेंबर २०१९ एकूण रु. **१५,९१,३२,८४८**/— हा विविध लेखाशिर्षा अंतर्गत खर्च झाला आहे.

या खर्चाचा लेखाजोखा परिवहन समीती समक्ष सादर करून व मान्यता प्राप्त करून कार्योत्तर वित्तीय मान्यता घेण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :— सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.

**विषय क्रमांक ०९ :—** परिवहन विभाग, मनपाचे आर्थिक वर्ष २०१९—२० मध्ये मनपा निधीतून रु. १०८कोटी निधी मंजूर करण्यात आला असून NMC The City of Nagpur Transport Fund, या बॅक ऑफ महाराष्ट्र, सिव्हिल लाईन्स नागपूरच्या Current Account मध्ये सुरूवातीची शिल्लकसह माहे डिसेंबर २०१९ रू. ६,००,१९,६७१.५०/— तिकीट विक्री चा महसुल जमा झाला आहे. त्यापैकी डिसेंबर २०१९ एकूण रु. **१६,६२,३१,३२८**/— हा विविध लेखाशिर्षा अंतर्गत खर्च झाला आहे.

या खर्चाचा लेखाजोखा परिवहन समीती समक्ष सादर करून व मान्यता प्राप्त करून कार्योत्तर वित्तीय मान्यता घेण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :— सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.

**विषय क्रमांक १० :—** परिवहन विभागातर्फे ०४ डेपोमधुन वाहतुकीची सुरूवात होत असून या डेपोमध्येच दररोजची रोकड जमा होते व ही रोकड दुसऱ्या दिवशी सकाळ पर्यंत त्याच ठिकाणी राहते व नंतर ही रक्कम मनपा मुख्यालयात असलेल्या बॅक ऑफ महाराष्ट्रातील परिवहन विभागाच्या खात्यात जमा करण्यात येते, प्रत्येक डेपोची रक्कम ही जवळपास दररोज ०४ ते ०५ लक्ष असून याकरीता सुरक्षा रक्षक ठेवणे आवश्यक आहे. तरी प्रत्येक पाळीत ०२ असे २४ सुरक्षा रक्षक सामान्य प्रशासन विभागाच्या निविदेतील मंजुर दरांवर मे. युनीटी सेक्युरीटी फोर्स यांचे तर्फे नेमणुक करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :— सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.

**विषय क्रमांक ११ :—** शहरबस सेवेच्या तिन्ही डेपो मधुन शहर बसेसचे परिचलन होत आहे. या डेपोमध्ये करारातील अटी व शर्तीनुसार डेपो चे बळकटीकरण व आवश्यक तेथे कम्पाऊंड वॉल मनपाद्वारे करून द्यावयाचे होते. याची आवश्यक त्या प्रमाणात पुर्तता झालेली नाही. दि. १४/०१/२०२० रोजी झालेल्या ऑपरेटर्स व परिवहन विभाग यांच्या झालेल्या संयुक्त सभेमध्ये अहवालातील मुद्या क्र. ११ मध्ये नमुद असल्याप्रमाणे मे. हंसा सिटी बस सर्व्हीसेस, मे. आर.के. सिटी बस सर्व्हीसेस व मे. ट्राव्हल टाईम सिटी बस सर्व्हीसेस यांनी, त्यांना शहरबस सेवा संचालनाकरिता दिलेल्या बस डेपो मधे अत्यंत आवश्यक ठिकाणी त्यांच्या डेपो चे आयब्लॉक/गटटु लावुन कठणीकरण करणे व वेस्ट वाटर लाईन टाकणे ही कामे करावयाचे असल्यामुळे प्रथमतः ते या कामाकरिता लागणारा खर्च स्वतः करतील अशी मंजुरी प्राप्त झालेली आहे.

या कामाकरिता परिहवन विभागाचे कनिष्ठ अभियंता व उपअभियंता त्या—त्या डेपो करिता सी.एस.आर.प्रमाणे प्राकलन तयार करतील. सदर प्राकलन मनपाचे सार्वजनिक विभागाचे कार्यकारी अभियंता यांचेकडुन तपासुन प्रशासकीय व आर्थीक मंजुरी प्राप्त करतील. या कामाकरिता जी रक्कम खर्च येईल ती रक्कम टप्प्या—टप्प्याने मनपा संबंधीत ऑपरेटर्स यांना परत करेल या निर्णयास सभेला उपस्थित असलेले सर्व डिझेल बस ऑपरेटर्स यांनी मान्य केलेले आहे. तरी या प्रस्तावास परिवहन समिती ची मंजुरी प्राप्त करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :— सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.

**विषय क्रमांक १२ :—** खापरी बस डेपो, वर्धा रोड येथे हॉल व ऑयलेट चे बांधकाम करणे तसेच अस्तित्वात असलेल्या इमारत दुरूस्ती करण्याच्या कामास्तव व रूपये ४१,२३,१३४/— च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व निविदा मागविण्यास्तव मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

**टिप:—**

१) उपरोक्त कामास तांत्रीक मंजुरी क्र. ६१/इइ./१९.२० दि. ०४.०१.२०२० ला तांत्रिक मान्यता दिलेली आहे.

२) उपरोक्त कामास पद क्र. A22701540703 (359) अंतर्गत रु. 4123134/- तरतुद उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**विषय क्रमांक १३ :—** नागपूर शहर बस परिवहन सेवेमध्ये वाहक/चालक तसेच बसेसचे तपासणी करणारे चेकर्स यांचे सोबत दिवसें दिवस होत असलेल्या असभ्य व अभद्र वागणूक व कधीकाळी होत असलेल्या मारहाणीच्या घटना लक्षात घेता यांचेवर आळा बसण्याचे उद्देशाने व अशा घटना उद्‌भवण्यासाठी कारणीभूत असलेल्या गुंड प्रवृत्तीच्या लोकांकडून बचावाचे दृष्टीने मा. सभापती यांनी दुसऱ्या पाळीतील वाहक, चालक व चेकर्स यांचेकरीता मार्गदर्शन शिबिराचे दि.१३जानेवारी २०२० रोजी कविवर्य सुरेश भट्ट सभागृह येथे आयोजन केलेले होते. या शिबिरात नागपूर शहर अपर पोलीस आयुक्त यांना सुद्धा निमंत्रित करण्यात आलेले होते. परंतु या शिबिरात मे. हंसा शहर बस सेवा यांचे ६५ चालक, आर.के. शहर बस सेवा यांचे ८१ चालक व मे. ट्रव्हल्स टाईम्स यांचे ५५ चालक त्याचप्रमाणे युनिटी सेक्युरिटी सर्व्हीसेस यांचे २०५ वाहक अनुपस्थित होते. त्यांनी केलेल्या कार्यालयीन आदेशाची अवेहलना व त्यांच्या निष्काळजी पणा करीता त्यांचे दिनांक १३ जानेवारी २०२० चे एक दिवसीय वेजेस कपात करण्याचे निर्देश संबंधीत ऑपरेटर्स् व एजेन्सीस यांना देण्यात आले असून त्यानुरूप मे. डिम्टस् या कंपनीचे माध्यमातुन देयके परिवहन विभागास पुढील मंजुरीस्तव सादर करण्याचे निर्देश देण्यात आलेले असून यास कार्योत्तर मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

२) तसेच मनपाचे परिवहन सेवे निमिताने मिळणारे उत्पन्नात वाढ होण्याकरीता वाहक/चालक यांची भविष्यात बैठक बोलाविण्यात आल्यास व अशा बैठकीस वाहक/चालक गैरहजर आढळल्यास त्यांचे वेजेस कपात करण्याचे अधिकार संबधीत वाहक/चालक एजेसींस यांना प्रदान करण्याचा व त्यानुरूप देयके डिम्टस् यांचे माध्यमातुन परिवहन विभागास पुढील मंजुरीस्तव सादर करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :— सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.

**विषय क्रमांक १४ :—**परिवहन विभागातर्फे दि. ३ जानेवारी २०२० रोजी पटवर्धन शहर बस डेपो सिताबर्डी, ऑरेंज स्ट्रिट शहर बस डेपो, हिंगणा व ट्राव्हल्स टाईम शहर बस डेपो, खापरी या तिनही डेपोमधून निघणाऱ्या प्रथम पाळीच्या बसेसचे आकस्मिकरित्या पहाटेस निरिक्षण केले असता या बसेसमध्ये बऱ्याच त्रृट्या आढळून आल्यात. डिझेल बस ऑपरेटर्स व मनपा यांचे दरम्यान झालेल्या दि. १०/०३/२०१७ च्या करारात नमुद एकूण ४० त्रृट्यांकरीता त्रृट्यानिहाय दंड स्वरुपात शास्ती लावणे अनिवार्य आहे. यास्तव संबंधित ऑपरेटर्स यांचेवर प्रत्येकी रु. ५ लक्ष दंड लावण्याचा व मे. डिम्ट्स यांच्या निष्काळजीपणामुळे त्यांच्यावर रु. २ लक्ष शास्ती लावण्याचा प्रश्न विचारात घेणे तसेच....

२. शहर बस संचालनाकरीता नागपूर महानगर पालिका व शहरबस संचालनाकरीता नियुक्त मे. आर.के. शहर बस सेवा, मे. हंसा शहरबससेवा व मे. ट्रव्हल्स टाईम शहरबस सेवा अशा तीन ऑपरेटर्स यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. ही सेवा प्रवासीभिमुख व उत्तम दर्जाची असावी याकरीता मनपा व वरील तिनही ऑपरेटर्स यांचे दरम्यान दि. १०/०३/२०१७ रोजी करारनामा करण्यात आलेला असून पी.ए.एस. (Performance Assessment System) ची अंमलबजावणी होणे अनिवार्य आहे. करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार पी.ए.एस. (Performance Assessment System) अंमलबजावणीसाठी मुद्या क्र.१ते ४० मध्ये नमुद त्रुट्यांकरीता दंड आकारण्याचे प्रावधान आहे. परंतु या प्रावधानांची आढळलेल्या त्रुट्यांकरीता मे. डिम्ट्स यांचेतर्फे अंमलबजावणी होत नाही. प्रवाशांकरीता सक्षम, प्रवासीभिमुख व दर्जेदार बस सेवा उपलब्ध व्हावी या करीता शास्ती लावण्याची अंमलबजावणी काटेकोरपणे होऊन आढळलेल्या त्रुट्यांकरीता शास्ती लावण्यास्तव रक्कम स्वरुपात दंड निश्चितीकरण करुन मे. डिम्ट्स द्वारे योग्य तो दंड लावण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :— सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.

————————————————————X————————————————————

परिवहन समितीच्या सभा, शनिवार दि. ०१/०२/२०२० रोजी सकाळी ११:०० वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

**उपस्थितसदस्य**

| अ. क्र | नावे | पद |
|---|---|---|
| 1 | **मा. श्री. नरेंद्र गोविंदराव बोरकर** | **सभापती** |
| 2 | मा. सौ. मनिषा आशिष धावडे | **सदस्या** |
| 3 | मा. सौ. वैशाली देवचंद रोहणकर | **सदस्या** |
| 4 | मा. सौ. विशाखा शरद बान्ते | **सदस्या** |
| 5 | मा. श्री. राजेश श्रावणजी घोडपागे | **सदस्य** |

**अनुपस्थितसदस्य**

| | | |
|---|---|---|
| 1 | **मा. श्री. प्रदीप वसंतराव पोहाणे**<br>**सभापती स्थायी समिती – पदेन सदस्य** | सदस्य |
| 2 | मा. श्री.नितीश गंगाप्रसाद ग्वालबंशी | सदस्य |
| 3 | मा. श्री. नरेंद्रनत्थुजी वालदे | सदस्य |
| 4 | मा. सौ. रुपा शेखर रॉय | सदस्या |
| 5 | मा. श्री. नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य |
| 6 | मा. सौ. अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| 7 | मा. श्री. नागेश महादेव मानकर | सदस्य |
| 8 | मा. सौ. रुपाली प्रशांतसिंह ठाकुर | सदस्या |

**उपस्थितअधिकारी**

| अ. क्र | नावे | पद |
|---|---|---|
| 1 | **श्री. राजेश मोहिते** | **परिवहनव्यवस्थापक** |

मा. सभापती, परिवहन समितीच्या सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक ०८</u> :—परिवहन विभाग, मनपाचे आर्थिक वर्ष २०१९—२० मध्ये मनपा निधीतून रु. १०८ कोटी निधी मंजूर करण्यात आला असून NMC The City of Nagpur Transport Fund, या बॅक ऑफ महाराष्ट्र, सिव्हिल लाईन्स नागपूरच्या Current Account मध्ये सुरूवातीची शिल्लकसह माहे ऑक्टोंबर २०१९ रू. ६,४६,९१,३४०/— तिकीट विक्रीचा महसुल जमा झाला आहे. त्यापैकी ऑक्टोंबर २०१९ एकूण रु. १८,३३,२३,१७२/— हा विविध लेखाशिर्षा अंतर्गत खर्च झाला आहे.

या खर्चाचा लेखाजोखा परिवहन समीती समक्ष सादर करून व मान्यता प्राप्त करून कार्योत्तर वित्तीय मान्यता घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक ०९</u>** :— परिवहन विभाग, मनपाचे आर्थिक वर्ष २०१९—२० मध्ये मनपा निधीतून रु. १०८ कोटी निधी मंजूर करण्यात आला असून NMC The City of Nagpur Transport Fund, या बॅक ऑफ महाराष्ट्र, सिव्हिल लाईन्स नागपूरच्या Current Account मध्ये सुरूवातीची शिल्लकसह माहे नोव्हेंबर २०१९ रू. ६,९३,१५,५१५.५०/— तिकीट विक्रीचा महसुल जमा झाला आहे. त्यापैकी नोव्हेंबर २०१९ एकूण रु. **१५,९१,३२,८४८**/— हा विविध लेखाशिर्षा अंतर्गत खर्च झाला आहे.

या खर्चाचा लेखाजोखा परिवहन समीती समक्ष सादर करून व मान्यता प्राप्त करून कार्योत्तर वित्तीय मान्यता घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक १०</u>** :— परिवहन विभाग, मनपाचे आर्थिक वर्ष २०१९—२० मध्ये मनपा निधीतून रु. १०८ कोटी निधी मंजूर करण्यात आला असून NMC The City of Nagpur Transport Fund, या बॅक ऑफ महाराष्ट्र, सिव्हिल लाईन्स नागपूर च्या Current Account मध्ये सुरूवातीची शिल्लकसह माहे डिसेंबर २०१९ रू. ६,००,१९,६७१.५०/— तिकीट विक्री चा महसुल जमा झाला आहे. त्यापैकी डिसेंबर २०१९ एकूण रु. **१६,६२,३१,३२८**/— हा विविध लेखा शिर्षाअंतर्गत खर्च झाला आहे.

या खर्चाचा लेखाजोखा परिवहन समीती समक्ष सादर करून व मान्यता प्राप्त करून कार्योत्तर वित्तीय मान्यता घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक ११</u>** :— परिवहन विभागातर्फे ०४ डेपो मधुन वाहतुकीची सुरूवात होत असून या डेपो मध्येच दररोजची रोकड जमा होते व ही रोकड दुसऱ्या दिवशी सकाळ पर्यंत त्याच ठिकाणी राहते व नंतरही रक्कम मनपा मुख्यालयात असलेल्या बॅक ऑफ महाराष्ट्रातील परिवहन विभागाच्या खात्यात जमा करण्यात येते, प्रत्येक डेपोची रक्कम ही जवळपास दररोज ०४ ते ०५ लक्ष असून याकरीता सुरक्षा रक्षक ठेवणे आवश्यक आहे. तरी प्रत्येक पाळीत ०२ असे २४ सुरक्षा रक्षक सामान्य प्रशासन विभागाच्या निविदेतील मंजुर दरांवर मे. युनीटी सेक्युरीटी फोर्स यांचे तर्फे नेमणुक करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक १२</u>** :— शहरबससेवेच्या तिन्ही डेपो मधुन शहरबसेसचे परिचलन होत आहे. या डेपोमध्ये करारातील अटी व शर्ती नुसार डेपोचे बळकटीकरण व आवश्यक तेथेकम्पाऊंडवॉलमनपाद्वारे करून द्यावयाचेहोते. याची आवश्यक त्या प्रमाणात पुर्तता झालेली नाही. दि. १४/०१/२०२० रोजी झालेल्या ऑपरेटर्स व परिवहन विभाग यांच्या झालेल्या संयुक्त सभेमध्ये अहवालातील मुद्दा क्र. ११ मध्ये नमुद असल्याप्रमाणे

मे. हंसासिटी बस सर्व्हीसेस, मे. आर.के. सिटी बस सर्व्हीसेस व मे. ट्राव्हल टाईम सिटी बस सर्व्हीसेस यांनी, त्यांना शहर बससेवा संचालनाकरिता दिलेल्या बस डेपो मधे अत्यंत आवश्यक ठिकाणी त्यांच्या डेपोचे आयब्लॉक/गट्टु लावुन कठणीकरण करणे व वेस्ट वाटर लाईन टाकणे ही कामे करावयाचे असल्यामुळे प्रथमत: ते या कामा करिता लागणारा खर्चस्वत: करतील अशी मंजुरी प्राप्त झालेली आहे.

या कामाकरिता परिहवन विभागाचे कनिष्ठ अभियंता व उपअभियंता त्या—त्या डेपो करिता सी.एस.आर. प्रमाणे प्राकलन तयार करतील.सदर प्राकलन मनपाचे सार्वजनिक विभागाचे कार्यकारी अभियंता यांचे कडुन तपासुन प्रशासकीय व आर्थीक मंजुरी प्राप्त करतील. याकामा करिता जी रक्कम खर्च येईल ती रक्कम टप्प्या—टप्प्याने मनपा संबंधीत ऑपरेटर्स यांना परत करेल या निर्णयास सभेला उपस्थित असलेले सर्व डिझेल बस ऑपरेटर्स यांनी मान्य केलेले आहे. तरी या प्रस्तावास परिवहन समितीची मंजुरी प्राप्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून या कामा करिता लघु निविदा काढण्यात याव्यात व हे काम तातडीने पुर्ण करण्यात यावे या मा. सभापती यांनी केलेल्या सुचनेस मंजूर मंजूर आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्रमांक १३** :— खापरी बस डेपो, वर्धा रोड येथे हॉल व टॉयलेटचे बांधकाम करणे तसेच अस्तित्वात असलेल्या इमारत दुरूस्ती करण्याच्या कामास्तव व रूपये ४१,२३,१३४/— च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व निविदा मागविण्यास्तव मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्रमांक १४** :— नागपूर शहर बस परिवहन सेवे मध्ये वाहक/चालक तसेच बसेसचे तपासणी करणारे चेकर्स यांचे सोबत दिवसेंदिवस होत असलेल्या असभ्य व अभद्र वागणूक व कधी काळी होत असलेल्या मारहाणीच्या घटना लक्षात घेता यांचेवर आळा बसण्याचे उद्देशाने व अशा घटना उद्‌भवण्यासाठी कारणीभूत असलेल्या गुंडप्रवृत्तीच्या लोकांकडून बचावाचे दृष्टीने मा. सभापती यांनी दुसऱ्या पाळीतील वाहक, चालक व चेकर्स यांचे करीता मार्गदर्शन शिबिरा चे दि. १३ जानेवारी २०२० रोजी कविवर्य सुरेश भट्ट सभागृह येथे आयोजन केलेले होते. या शिबिरात नागपूर शहर अपर पोलीस आयुक्त यांना सुद्धा निमंत्रित करण्यात आलेले होते. परंतु या शिबिरात मे. हंसा शहर बस सेवा यांचे ६५ चालक, आर.के. शहर बस सेवा यांचे ८१ चालक व मे. ट्राव्हल टाईम्स यांचे ५५ चालक त्याच प्रमाणे युनिटी सेक्युरिटी सर्व्हीसेस यांचे २०५ वाहक अनुपस्थित होते. त्यांनी केलेल्या कार्यालयीन आदेशाची अवेहलना व त्यांच्या निष्काळजीपणा करीता त्यांचे दिनांक १३ जानेवारी २०२० चे एक दिवसीय वेजेस कपात करण्याचे निर्देश संबंधीत ऑपरेटर्स् व एजेन्सीस यांना देण्यात आले असून त्यानुरूप मे. डिम्टस् या कंपनीचे माध्यमातुन देयके परिवहन विभागास पुढील मंजुरीस्तव सादर करण्याचे निर्देश देण्यात आलेले असून यास कार्योत्तर मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

२) तसेच मनपाचे परिवहन सेवे निमिताने मिळणारे उत्पन्नात वाढ होण्याकरीता वाहक/चालक यांची भविष्यात बैठक बोलाविण्यात आल्यास व अशा बैठकीस वाहक/चालक गैरहजर आढळल्यास त्यांचे वेजेस कपात करण्याचे अधिकार संबधीत वाहक/चालक एजेसींस यांना प्रदान करण्याचा व त्यानुरूप देयके डिम्टस् यांचे माध्यमातुन परिवहन विभागास पुढील मंजुरीस्तव सादर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक १५ —</u>** आजच्या सभेची कार्यवाही कायम करुन सभा अनिश्चित काळाकरीता स्थगीत करण्यात आली.

| | |
|---|---|
| **निगम सचिव** | **सभापती** |
| **ना.म.पा. नागपूर** | **परिवहनसमिती** |